UPSC GUIDE
BY THE ACHIEVERS FOR THE ASPIRANTS

# संरक्षण घडामोडी

**Miss.Megha Satras**

**Rajyaseva 2024**

**(Dy. Director of Industries 2024)**

## ➢ ऑपरेशन सिंधू:

इराण-इज्राईल युद्धादरम्यान इराणमधून भारतीय नागरिकांना बाहेर काढण्यासाठी भारताने ऑपरेशन सिंधू राबवले आहे.

- संबंधित मंत्रालय: परराष्ट्र मंत्रालय
- 4034 लोकांना भारतात आणण्यात आले.

## ➢ पूर्वी राबवण्यात आलेला याप्रकारच्या मोहिमा:

- 2021: ऑपरेशन देवीशक्ती — तालिबानच्या ताब्यात गेल्यानंतर अफगाणिस्तानातून भारतीयांना बाहेर काढणे.
- 2022: ऑपरेशन गंगा — रशिया-युक्रेन संघर्षातून भारतीयांना बाहेर काढणे.
- 2023: ऑपरेशन कावेरी — सुदान संघर्षातून भारतीय नागरिकांचे सुट्का करणे.
- 2023: ऑपरेशन अजय — इज्राईल-गाझा संघर्षादरम्यान भारतीयांना बाहेर काढणे

- **Financial Action Task Force (FATF)** ने चार आफ्रिकन देशांना ग्रे लिस्टमधून वगळले.
- हा निर्णय ऑक्टोबर 2025 मध्ये Paris येथे झालेल्या FATF बैठकीत घेण्यात आला.
- ग्रे लिस्टमधून वगळलेले देश: South Africa,Nigeria,Mozambique,Burkina Faso

**FATF बद्दल:**
- स्थापना: 1989
- मुख्यालय: Paris

**उद्देश:**
- मनी लॉन्ड्रिंग (Money Laundering) रोखणे
- दहशतवादाला होणारा आर्थिक पुरवठा (Terror Financing) थांबवणे
- FATF ग्रे लिस्ट: आर्थिक व्यवहारांवर लक्ष ठेवली जाणारी देशांची यादी.
- ब्लॅक लिस्ट: नियमांचे पालन न करणाऱ्या उच्च जोखमीच्या देशांची यादी

## ➢ सौदी अरेबिया – प्रमुख गैर-नाटो मित्र (Major Non-NATO Ally)

**United States ने Saudi Arabia ला "Major Non-NATO Ally (MNNA)" म्हणून घोषित केले आहे.**

- **Major Non-NATO Ally हा अमेरिकेचा एक विशेष धोरणात्मक दर्जा आहे.**

➢ **या दर्जाचा अर्थ:**

- **संरक्षण क्षेत्रात जास्त सहकार्य**
- **लष्करी तंत्रज्ञान आणि उपकरणे मिळविण्यास प्राधान्य**

➢ **हा दर्जा North Atlantic Treaty Organization (NATO) सदस्यत्वासारखा नाही.म्हणजेच NATO प्रमाणे सामूहिक सुरक्षा हमी (collective defence guarantee) मिळत नाही.**

➢ **Major Non-NATO Ally (MNNA) हा दर्जा अमेरिकेच्या काही महत्त्वाच्या संरक्षण भागीदार देशांना दिला जातो.उदाहरणे:Israel,Japan,Australia,South Korea**

## ➤ हॅमर क्षेपणास्त्र (HAMMER Missile):

**Highly Agile Modular Munition Extended Range (HAMMER)**

- **प्रकार: हवेतून जमिनीवर मारा करणारे Precision Guided Weapon**
- **संयुक्त निर्मिती: भारत आणि फ्रान्स**
- **उत्पादन करणाऱ्या कंपन्या:Safran (फ्रान्स),Bharat Electronics Limited (भारत)**
- **मुख्य वैशिष्ट्ये**
- **पल्ला: सुमारे 60 ते 70 किमी**
- **तत्त्व: Fire and Forget – लक्ष्य निश्चित केल्यानंतर सतत नियंत्रणाची गरज नसते**
- **प्रकार: अचूक लक्ष्य भेदन करणारे modular smart weapon**

## ➢ब्राह्मोस क्षेपणास्त्र (BrahMos Missile):

- प्रकार:सुपरसॉनिक क्रूझ क्षेपणास्त्र
- विकास: Defence Research and Development Organisation (भारत) आणि NPO Mashinostroyenia (रशिया) यांचा संयुक्त प्रकल्प
- नावाची उत्पत्ती:Brahmaputra River (भारत),Moskva River (रशिया)

## ➢ महत्त्वाची वैशिष्ट्ये:

- इंजिन: रॅमजेट इंजिन
- वेग: सुमारे मॅक 2.8 (ध्वनीच्या वेगाच्या जवळपास 3 पट)
- वजन: सुमारे 2500 – 3000 किलोग्रॅम

## ➢ पल्ला (Range):

- सुरुवातीचा पल्ला: सुमारे 290 किमी
- वाढीव पल्ला: 450 ते 800 किमीपल्ला वाढवण्याचे
- कारण: भारत Missile Technology Control Regime (MTCR) चा सदस्य झाल्यानंतर सुधारणा शक्य झाली.
- जमीन, समुद्र आणि हवा या तिन्ही प्लॅटफॉर्मवरून डागता येणारे जगातील अत्यंत वेगवान क्रूझ क्षेपणास्त्रांपैकी एक.

## ➢ प्रलय क्षेपणास्त्र (Pralay Missile):

- विकास संस्था: Defence Research and Development Organisation (DRDO)
- प्रकार: जमिनीवरून जमिनीवर मारा करणारे क्वासी-बॅलिस्टिक क्षेपणास्त्र
- चाचणी ठिकाण: Dr. APJ Abdul Kalam Island
- पल्ला (Range): सुमारे 350 ते 500 किमी (लघुपल्ला)
- पेलोड क्षमता: सुमारे 500 ते 1000 किलोग्रॅम

➢ वैशिष्ट्य:

- हवेत असताना मार्ग बदलण्याची क्षमता (Manoeuvrable trajectory)
- शत्रूच्या मिसाइल संरक्षण प्रणालीला चकवा देण्यास सक्षम

## ➢ K-4 क्षेपणास्त्र (K-4 Missile):

- विकास संस्था: Defence Research and Development Organisation (DRDO)
- प्रकार: पाणबुडीवरून डागता येणारे बॅलिस्टिक क्षेपणास्त्र (SLBM – Submarine Launched Ballistic Missile)
- पल्ला: सुमारे 3,500 किमी
- श्रेणी: मध्यम पल्ल्याचे बॅलिस्टिक क्षेपणास्त्र (MRBM)

➢ वैशिष्ट्ये:

- पाणबुडीमधून गुप्तपणे प्रक्षेपित करता येते
- भारताच्या समुद्राधारित अणु प्रतिरोधक क्षमतेचा (Nuclear Deterrence) महत्त्वाचा भाग

## ➢ अग्निवीरांसाठी आरक्षण (CAPF मध्ये)

Ministry of Home Affairs ने केंद्रीय सशस्त्र पोलीस दलांमध्ये (CAPF) गट 'क' पदांसाठी माजी अग्निवीरांसाठी आरक्षण वाढवले.

- ➢ आरक्षण वाढ: 10% वरून 50% पर्यंत
- ➢ उदाहरण: Border Security Force मधील कॉन्स्टेबल पदाच्या 50% रिक्त जागा माजी अग्निवीरांसाठी राखीव.

## ➢ अग्निपथ योजना (Agnipath Scheme):

- ➢ सुरुवात: 14 जून 2022
- ➢ उद्देश:
  - भारतीय सशस्त्र दलांमध्ये तरुणांची भरती वाढवणे
  - सैन्याचे सरासरी वय कमी करणे
  - आधुनिक व तांत्रिकदृष्ट्या सक्षम सैन्य तयार करणे
- ➢ वयोमर्यादा: 17.5 ते 21 वर्षे
- ➢ सेवा कालावधी: 4 वर्षे
- ➢ शैक्षणिक पात्रता: 10 वी किंवा 12 वी उत्तीर्ण

## ➢ राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू यांचे राफेलमधून उड्डाण:

- भारताच्या राष्ट्रपती Droupadi Murmu यांनी हरियाणातील अंबाला येथील भारतीय वायुसेना तळावरून Dassault Rafale लढाऊ विमानातून उड्डाण केले.
- यामुळे त्या भारतीय वायुसेनेच्या दोन वेगवेगळ्या लढाऊ विमानांतून उड्डाण करणाऱ्या भारताच्या पहिल्या राष्ट्रपती ठरल्या.
- यापूर्वी एप्रिल 2023 मध्ये त्यांनी आसाममधील तेजपूर येथे Sukhoi Su-30MKI मधून उड्डाण केले होते.

➢ लढाऊ विमानातून उड्डाण करणारे इतर राष्ट्रपती:

1) A. P. J. Abdul Kalam – 2006
2) Pratibha Patil – 2009

➢ राफेल लढाऊ विमान हे फ्रान्सच्या Dassault Aviation कंपनीने तयार केले असून ते सप्टेंबर 2020 मध्ये अंबाला वायुसेना तळावर भारतीय वायुसेनेत औपचारिकपणे समाविष्ट करण्यात आले.

## ➢ SIPRI Yearbook 2025 – जागतिक अण्वस्त्र स्थिती

- Stockholm International Peace Research Institute (SIPRI) च्या Yearbook 2025 अहवालानुसार जगातील अण्वस्त्रांची अद्ययावत स्थिती जाहीर करण्यात आली आहे.
- या अहवालानुसार जानेवारी 2025 पर्यंत भारताकडे पाकिस्तानपेक्षा जास्त अण्वस्त्रे आहेत.

भारताकडे सुमारे 180 अण्वस्त्र वॉरहेड्स असल्याचे नमूद केले आहे.

## ➢ जगातील प्रमुख देशांनुसार अण्वस्त्रांची संख्या (2025):

1) रशिया: 4309
2) अमेरिका: 3700
3) चीन: 600
4) फ्रान्स: 295
5) युनायटेड किंगडम (UK): 225
6) भारत: 180
7) पाकिस्तान: 170

## ➢ कारगील शौर्य वाटिका – जयपूर, राजस्थान

कारगील शौर्य वाटिका ही राजस्थान विधानसभेने १९९९ च्या कारगील युद्धात शहीद झालेल्या सैनिकांच्या स्मृतीसाठी स्थापन केली आहे.

स्थान: जयपूर, राजस्थान

उद्देश: शहीद सैनिकांच्या स्मरणार्थ जागा आणि शौर्याची सन्मानात्मक ओळख निर्माण करणे.

## ➢ INS उदयगिरी – प्रोजेक्ट 17A स्टेल्थ फ्रिगेट्स

INS उदयगिरी हे प्रोजेक्ट 17A अंतर्गत दुसरे स्टेल्थ फ्रिगेट जहाज आहे.

हे जहाज शिवालिक श्रेणीतील जहाजांची जागा घेणार आहे.

या प्रकल्पात एकूण सात जहाजे बांधली जात आहेत.

बांधणी: Mazgaon Dock Ship builders Limited, मुंबई आणि Garden Reach Shipbuilders & Engineers, कोलकाता

उद्देश: भारतीय नौदलासाठी आधुनिक स्टेल्थ फ्रिगेट्स उपलब्ध करून देणे

## ➢ पृथ्वी-II क्षेपणास्त्र:

- पृथ्वी-II हे जमिनीवरून जमिनीवर मारले जाणारे लघुपल्ल्याचे बॅलिस्टिक क्षेपणास्त्र आहे.
- याचा पल्ला 350 किलोमीटर आहे.
- हे DRDO ने विकसित केले असून उत्पादक संस्था भारत डायनॅमिक्स लिमिटेड आहे.

## ➢ अग्नि 1 क्षेपणास्त्र:

- अग्नि 1 हे देखील लघुपल्ल्याचे बॅलिस्टिक क्षेपणास्त्र असून जमिनीवरून जमिनीवर मारले जाते.
- याचा पल्ला 700–900 किलोमीटर आहे.
- हे देखील DRDO ने विकसित केले असून उत्पादक संस्था भारत डायनॅमिक्स लिमिटेड आहे

## ➢ आकाश प्राईम क्षेपणास्त्र – भारतीय लष्कर

- भारतीय लष्कराने स्वदेशी बनावटीच्या आकाश प्राईम हवाई संरक्षण क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी लडाखमध्ये 15,000 फूट उंचीवर घेतली आहे.
- प्रकार: जमिनीवरून हवेत मारले जाणारे
- विकसित: DRDO
- श्रेणी: 25–30 किमी अंतर
- वेग: Mach 2.5
- महत्त्व: आकाश हवाई संरक्षण प्रणालीचे तिसरे आणि चौथे रेजिमेंट

## समुद्र प्रचेत जहाजाचे अनावरण :

- **संस्था: Indian Coast Guard**
- **निर्माता: Goa Shipyard Limited**
- **वैशिष्ट्ये: जहाज 75 % स्वदेशी भागांपासून तयार**
- **दुसरे स्वदेशी प्रदूषण नियंत्रण जहाज (PCV)**
- **उद्देश: तटीय सुरक्षा आणि समुद्री प्रचलनांची सुरक्षा**
- **विशेष आर्थिक क्षेत्रातील(EEZ) कोणत्याही तेलगळतीला त्वरित आणि परिणामकारक प्रतिसाद देण्यास मदत होईल.**

## ➢ ‘कालभैरव’ – भारताचा AI-सक्षम लढाऊ ड्रोन

‘कालभैरव’ (Kalbhairav) हा भारताचा AI-सक्षम मध्यम उंचीवर दीर्घकाळ उड्डाण करणारा लढाऊ ड्रोन असून त्याची निर्मिती Flying Wedge Defence and Aerospace या भारतीय कंपनीने केली आहे. हा ड्रोन स्वदेशी तंत्रज्ञानावर आधारित प्रगत मानवरहित लढाऊ प्रणाली आहे.

## ➢ गाझा शांतता शिखर परिषद:

गाझा संघर्षावर चर्चा करण्यासाठी शांतता शिखर परिषद Sharm El-Sheikh येथे आयोजित करण्यात आली. या परिषदेत Donald Trump (अमेरिका) आणि Abdel Fattah el-Sisi (इजिप्त) यांनी अध्यक्षता केली.

## ➢ लेझर शस्त्रांचा वापर – इस्त्राईल

गाझामध्ये सुरू असलेल्या युद्धादरम्यान Israel ने शत्रूचे ड्रोन पाडण्यासाठी लेझर शस्त्रांचा वापर केला असून त्यामुळे लेझर शस्त्रे प्रत्यक्ष युद्धात वापरणारा जगातील पहिला देश ठरला आहे.

## ➢ ऑपरेशन बुलियन ब्लेझ (Operation Bullion Blaze):

**कारवाई करणारी संस्था: Directorate of Revenue Intelligence (DRI)**

**ठिकाण: Mumbai**

**उद्देश: सोने तस्करी करणाऱ्या मोठ्या टोळीचा पर्दाफाश करणे.**

## ➢ खोरमशहर (Khorramshahr) क्षेपणास्त्र – इराण

**खोरमशहर (Khorramshahr) हे मध्यम पल्ल्याचे बॅलिस्टिक क्षेपणास्त्र (MRBM) असून त्याची निर्मिती Iran ने केली आहे. हे इराणच्या सर्वात शक्तिशाली क्षेपणास्त्रांपैकी एक मानले जाते.**

## ➢ 'फतह' क्षेपणास्त्र – पाकिस्तान

**'फतह' (Fateh) क्षेपणास्त्र हे पाकिस्तानने विकसित केलेले जमिनीवरून जमिनीवर मारा करणारे मार्गदर्शित क्षेपणास्त्र (Surface-to-Surface Missile) आहे.**

## ➢ ह्वासोंग-20 (Hwasong-20) आंतरखंडीय क्षेपणास्त्र

**ह्वासोंग-20 (Hwasong-20) हे नवीन आंतरखंडीय बॅलिस्टिक क्षेपणास्त्र (ICBM) असून ते North Korea ने Pyongyang येथे आयोजित लष्करी संचलनात सादर केले.**

## ➢ गोल्डन डोम – हवाई संरक्षण प्रणाली

- अमेरिकेने गोल्डन डोम (Golden Dome) नावाची महत्त्वाकांक्षी हवाई संरक्षण प्रणाली विकसित करण्याची घोषणा केली आहे.
- या प्रणालीचा उद्देश शत्रूच्या मिसाइल, ड्रोन आणि हवाई हल्ल्यांपासून संरक्षण करणे हा आहे.

➢ जगातील विविध देशांच्या प्रमुख हवाई संरक्षण प्रणाली पुढीलप्रमाणे आहेत:

- अमेरिका: Golden Dome, THAAD (Terminal High Altitude Area Defense)
- रशिया: S-400
- इझ्रायल: Iron Dome
- भारत: सुदर्शन चक्र
- चीन: HQ-9

## ➢ Operation Jeevan Jyot-2:

Punjab सरकारने रस्त्यावर राहणाऱ्या मुलांना वाचवून त्यांना शाळेत दाखल करण्यासाठी ही मोहीम सुरू केली.

## ➢ Operation Fire Trail:

Directorate of Revenue Intelligence ने पर्यावरण व सुरक्षिततेला धोका निर्माण करणाऱ्या चिनी फटाक्यांच्या बेकायदेशीर आयातीवर कारवाई करण्यासाठी ही मोहीम राबवली.

## ➢ Operation Black Forest:

भारतीय सुरक्षा दलांनी 21 एप्रिल 2025 रोजी Chhattisgarh आणि Telangana मधील भागांमध्ये नक्षलवाद्यांविरुद्ध मोठी कारवाई सुरू केली.

## ➢ Operation AAHT:

Railway Protection Force द्वारे भारतीय रेल्वे नेटवर्कचा वापर करून होणारी मानवी तस्करी रोखण्यासाठीही मोहीम राबवली जाते.ज

## लष्करी सराव:

- **Desert Cyclone 2025 : India – United Arab Emirates (संयुक्त लष्कर सराव)**
- **Harimau Shakti 2025: India – Malaysia (संयुक्त लष्कर सराव)**
- **Ajeya Warrior 2025 : India – United Kingdom (संयुक्त लष्कर सराव)**
- **Ekuverin 2025 : India – Maldives (संयुक्त लष्कर सराव)**
- **Ekatha Exercise 2025: India – Maldives (संयुक्त सागरी सराव)**
- **Garuda Shakti : India – Indonesia (विशेष दल सराव)**
- **Surya Kiran 2025 : India – Nepal (संयुक्त लष्कर सराव)**
- **Garuda 2025 : India – France (हवाई दल सराव)**

- **Mitra Shakti XI : India – Sri Lanka (संयुक्त लष्कर सराव)**

- **Malabar Naval Exercise:India, United States, Japan, Australia (क्वाड देशांचा नौदल सराव)**

- **Exercise Bold Kurukshetra : भारत - Singapore (संयुक्त लष्कर सराव)**

- **SIMBEX 2025 : भारत आणि सिंगापूर यांच्यातील सागरी द्विपक्षीय सराव.**

- **Exercise Shakti 2025 : भारत – France(संयुक्त लष्कर सराव)**

- **Nomadic Elephant : भारत-Mongolia (संयुक्त लष्कर सराव)**